लोकसत्ता

# मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी निवड



जाहीर केली. डॉ. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. शिर्के यांना गेल्या ३५ वर्षांचा शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय अनुभव आहे. त्यांनी विद्यापीठाशी निगडित सर्व अधिकार मंडळांसह कुलसचिव, प्र-कुलगुरू पदे भूषविली आहेत. या निवडीबद्दल डॉ. शिर्के यांनी कुलपतींनी केलेली निवड सार्थ करण्याचा प्रयत्न राहील. त्याचप्रमाणे या कामगिरीला न्याय देण्यासाठी आपण या कार्यकाळात प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

21 SEP 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अज्ञातचे नाते ज्ञात गोष्टींशी शोधा

## कुलगुरू प्रा. मुदगल; विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप

कोल्हापूर, ता. २० : माहिती आणि ज्ञान यातील फरक समजून घ्या, आणि अज्ञात गोष्टींचे नाते ज्ञात गोष्टींशी शोधा, असे मत डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राजेशकुमार मुदगल यांनी शिवाजी विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले. प्रा. मुदगल यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठाच्या सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी विभागाच्या डीन प्रा. एस. एच. ठकार आदी उपस्थित होते. भारत सरकार विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय (DST) प्रायोजित स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेंतर्गत सातदिवसीय कार्यशाळेचे आयोजन १२ ते १८ सप्टेंबरदरम्यान केले होते. प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण भारतात हा कार्यक्रम होत आहे. अनेक आयआयटी, केंद्रीय विद्यापीठ तसेच विविध संस्थांत स्तुती कार्यक्रमांतर्गत सहावा कार्यक्रम होता. प्रशिक्षणादरम्यान झालेल्या व्याख्यानावर आधारित प्रश्नमंजूषा झाली. त्यात असीम हुसेन, शंकर हुंबे आणि ऋतुजा गुरव यांना अनुक्रमे पारितोषिक मिळाले. प्रा. ठकार यांनी हा कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी संलग्न असल्याचे सांगितले.



कुलगुरू प्रा. शिर्के यांनी 'वर्गाबाहेर आयुष्यात येणारी परिस्थितीच शिकवत असते' असे मत व्यक्त करून या अत्याधुनिक उपकरणांवर मिळालेले शिक्षण सर्वांना त्यांच्या शोधकार्यात उपयोगी पडेल, असे नमूद केले. त्यांनी या सैफ सेंटरचे व प्रा. सोनकवडेंच्या परिश्रमाचे कौतुक केले.

'स्तुती'चे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी समारोपप्रसंगी आठवडाभराच्या कार्यक्रमाचा आढावा घेत, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय (DST), शिवाजी विद्यापीठ कुलगुरू व व्यवस्थापन परिषदेचे आभार मानले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे. शेजारी कुलगुरू प्रा. राजेशकुमार मुदगल, कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, प्रा. एस. एच. ठकार.

21 SEP 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारताचे सर्वच क्षेत्रात उज्ज्वल भविष्य

- शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी सेंटरचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे प्रतिपादन
- दैनिक 'तरुण भारत' कार्यालयाला सदिच्छा भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

इंधन, विद्युत निर्मितीत सध्या भारत मागे आहे, हे खरे असले तरी सोलार आणि इलेक्ट्रिक बाईक हे त्यावर उत्तम पर्याय बनला आहे. परंतू इंधन, इलेक्ट्रीकल, तंत्रज्ञान, उद्योक सर्वच क्षेत्रात भारताला उज्ज्वल भविष्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटीसेंटरचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले.

दैनिक 'तरुण भारत' कार्यालयाला मंगळवारी डॉ. सोनकवडे यांनी सदिच्छा भेट दिली. भेटी दरम्यान 'तरुण भारत'च्या प्रतिनिधींशी चर्चा करताना ते बोलत होते. दैनिक 'तरुण भारत' कोल्हापूर आवृत्तीचे निवासी संपादक मनोज साळुंखे यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी सेंटरचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा सत्कार करताना 'तरुण भारत'चे निवासी संपादक मनोज साळुंखे.**

डॉ. सोनकवडे म्हणाले, देशाच्या विकासात शास्त्रज्ञांचे मोलाचे योगदान आहे. कोरोना कालावधीतही शास्त्रज्ञांनी संशोधन करून लस तयार करीत अनेकांना जीवदान दिले. तंत्रज्ञानाचे ज्ञान असलेले पूरक मनुष्यबळ तयार करण्याची प्रक्रिया देशभर सुरू आहे. भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी सेंटरमध्ये अत्याधुनिक १४ उपकरणे आहेत. या उपकरणामध्ये कोणत्याही संशोधनाचा नमुना (सॅम्पल) चाचणी करता येते. यापुर्वी नमुना चाचणीसाठी कोरियाला जावे लागत होते. आता विद्यापीठातील सैफ सेंटरमध्येच सर्व प्रकारच्या नमुण्यांची चाचणी करता येते. दिल्ली, हरियाणा, आंध्रप्रदेश, श्रीनगर, गुजरात देशातील आदी राज्य व परदेशातील संशोधक आणि फौंड्री कंपन्या या अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून सॅम्पल चाचणी करीत आहेत. त्यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाते. या शुल्कातून सहा महिन्यात सेंटरला दहा लाखांचा फायदा झाला आहे. भविष्यात सरकारचे अनुदान बंद झाल्यानंतर सैफ सेंटर स्वत: सर्व खर्च करण्यासाठी सक्षम बनेल याची मला खात्री आहे.

यावेळी 'तरुण भारत'चे प्रशासन अधिकारी राहूल शिंदे, विशेष प्रतिनिधी सुधाकर काशिद, उप मुख्य प्रतिनिधी संतोष पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'विद्यापीठातील सैफ डीएसटी केंद्र देशभरातील वापरकर्त्यांसाठी समर्पित'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक व संशोधक, विद्वान सैफ-डीएसटी केंद्रातील अत्याधुनिक उपकरणे सुविधेचे कौतुक करतात तेव्हा गौरवशाली वाटते. हे केंद्र भारतातील सर्व वापरकर्त्यांसाठी समर्पित आहे, असे प्रतिपादन प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'स्तुती' अंतर्गत चालू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पाचव्या दिवशी मार्गदर्शनपर व्याख्यानानंतर सहभागी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल घडविण्यात आली. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रा. राजाराम माने यांनी 'नॅनोस्ट्रक्चर आणि त्यांचे उपयोग' या विषयावर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डॉ. टी. डी. डोंगळे यांनी सहभागींना 'मेथडस् अँड प्रोटोकॉल्स फोर द मेजरमेंट ऑफ वोलाटाइल मेमरी अँड सिनेप्टिक लर्निंग प्रॉपर्टीज ऑफ रेसिस्टिव स्विचिंग डीव्हाईसेस' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना स्तुतीअंतर्गत शैक्षणिक सहलीअंतर्गत किल्ले पन्हाळ्याची सफर घडविली.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाडीमध्ये

## जिल्हास्तरीय महोत्सव १० ऑक्टोबरपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा मध्यवर्ती युवा महोत्सव यंदा सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात दि. १६ ते १८ ऑक्टोबर दरम्यान रंगणार आहे. जिल्हास्तरीय महोत्सवाची सुरूवात दि. १० ऑक्टोबरपासून कोल्हापुरातून होईल. त्याची तयारी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून सुरू आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचा महोत्सव दि. १० ऑक्टोबर रोजी गडहिंग्लज येथील डॉ. घाळी कॉलेजमध्ये, दि. १२ ऑक्टोबरला सांगली जिल्ह्याचा महोत्सव पेठ येथील श्री व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ सायन्समध्ये, तर दि. १४ ऑक्टोबर रोजी कऱ्हाडमधील सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये सातारा जिल्ह्याचा युवा महोत्सव होणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात अभियंता दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे इंजिनिअर प्रशांत हडकर व अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

इंजिनिअर प्रशांत हडकर यांनी बी.टेक. सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना इनोव्हेटिव्ह मटेरियल्स अँड कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सध्याच्या काळात इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटचा वेग प्रचंड आहे. नवीन बांधकाम मटेरियल्स वापरणे गरजेचे आहे. त्यासाठी मटेरियल सायन्सचा अभ्यास अत्यावश्यक आहे. पाहुण्यांची ओळख डॉ. पी. पी. फडणीस यांनी करून दिली. इंजिनिअर महेश साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी इंजि. वाय. एस. व्हटकर, इंजि. ए. आर. रेणावीकर आदी उपस्थित होते.

21 SEP 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# जगबुडीला निमंत्रण!

नुकतीच रायगड जिल्ह्यातील भूप्रदेशामध्ये झालेल्या घटीसंदर्भात बातमी प्रसिद्ध झाली. एकट्या रायगड जिल्ह्यातील देवगडच्या किनारपट्टीची ५५ हेक्टर जमीन कमी झाली आहे. एवढ्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाची दहा क्रिकेटची मैदाने बांधता आली असती. पुण्याच्या सृष्टी कॉंझर्वेशन फाऊंडेशनच्या अभ्यासातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. १९९० ते २०२२ या साधारण ३२ वर्षात हा बदल झाला आहे. यामुळे केवळ भूभाग कमी झाला आहे असे नाही, तर त्या जागेवर असणारी भूचर आणि पाणथळ जीवसृष्टी नष्ट झाली आहे; म्हणजेच विनाश पावली आहे. उपग्रहाच्या मदतीने घेतलेल्या छायाचित्रांच्या अभ्यासातून ही बाब स्पष्ट झाली. या भागात पूर्वीच्या तुलनेत ३०० ते ५०० मीटर किनारा आत शिरला आहे. त्याहीपेक्षा जास्त भागातील जमिनीची धूप झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मनात विचार आला, असेच जर समुद्राचे पाणी जमीन गिळू लागले तर मानवाने जायचे कोठे? सह्याद्रीच्या शिखरावर तर घर बांधता येणार नाही. हिमशिखरावरही घरे बांधता येणार नाहीत. वारंवार येणारे पूर, अचानक येणारा पाऊस, कोठेही पडणारा दुष्काळ, होणारी ढगफुटी हे सर्व पाहिल्यानंतर डोंगराच्या टोकाला घरे बांधून राहणे शक्य होणार नाही. शेतीचे तर चित्र अवघड आहे. त्यातच 'मुंबईची तुंबई' ही दरवर्षी एकदा तरी वृत्तपत्रांची होणारी हेडलाईन. यावर्षी मात्र यामध्ये बेंगलोर, पुणे, नाशिक इत्यादी शहरांसाठीही खरी ठरली. एकीकडे भारत आणि पाकिस्तानात पुराने आणि अतिवृष्टीने कहर केला असताना, चीन मात्र दुष्काळाने त्रस्त झाला आहे. हे पाणी या निसर्गातील एका घटकामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीबाबत आहे.

अर्थात पर्यावरणतज्ज्ञांना ही बातमी वाचून धक्का बसणार नाही. यासंदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या संशोधनाच्या निष्कर्षातून जागतिक पातळीवर पर्यावरणाचे, निसर्गाचे संवर्धन केले नाही तर अनेक आपत्तींचा सामना करावा लागेल, असा इशारा वारंवार देण्यात आला आहे. पर्यावरणतज्ज्ञ याबाबत वारंवार सांगत आले आहेत. भूभागावर समुद्राच्या आक्रमणाबाबत चिंता व्यक्त करत असताना मुंबई आणि आजूबाजूच्या घरांसाठी मानवाने समुद्रावर किती आक्रमण केले याचा विचार आपण करायला हवा. समुद्रात घरे आणि प्रकल्प उभे करण्यास तज्ज्ञांचा कायमच विरोध राहिला. मात्र, त्यांना 'विकासाचे विरोधक' असे मानण्यात आले आहे. बरे, अशा प्रकारची ही पहिली बातमी नाही.

यापूर्वी पश्चिम बंगालमधील घोलामारा नावाचे बेट होते, २००१ साली या बेटाचा आकार ८० चौरस किलोमीटर होता. या बेटावर गाव वसलेले होते. ४० हजार लोकांची या बेटावर वस्ती होती. तेथे उत्तम प्रकारची पारंपरिक शेती होत असे. जंगलातून मिळणारे उत्पन्न, मासेमारी करत हे लोक सुखाने जगत होते. त्यांच्याकडे वल्हवण्याच्या बोटी होत्या. प्रदूषण करण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांची राहणीही साधी होती. त्यांचा तापमान वाढीमध्ये कसलाही संबंध नव्हता. मात्र, या भागातील समुद्राची पातळी वाढू लागली आणि एका तपामध्ये या लोकांना गाव खाली करून दुसरीकडे आसरा घ्यावा लागला. या लोकांचा कोणताही दोष नसताना, त्या जागेवर कोणताही प्रकल्प उभारलेला नसताना, तेथील लोकांना विस्थापित व्हावे लागले. आज या बेटाचे क्षेत्र पाच हजार चौरस मीटरपेक्षा कमी उरले आहे आणि तेथे कोणीही रहात नाही.

घोलामारा हे बुडणारे एकमेव बेट नाही. अशा प्रकारे मागील ३० वर्षांत पश्चिम बंगालमधील जवळपास २२ बेटे समुद्राने गिळली आहेत. आणखी १० बेटे पाण्याखाली चालली आहेत. एकीकडे आपण समुद्रात भर घालून जमीन मिळवत असताना दुसरीकडे समुद्राच्या पाण्याखाली बेटे आणि भूभाग जात आहे. हा सर्व वायू प्रदूषणामुळे होणाऱ्या जागतिक तापमानवाढीचा परिणाम आहे. खनिज तेल, दगडी कोळसा यांचा अविचारी वापर, हरित वायुंचा अनिर्बंध वापर या सर्व गोष्टींचा परिणाम आहे. हे आता सर्वज्ञात असूनही मानव अजूनही आपले वागणे बदलत नाही. पृथ्वीवरील होणारे प्रदूषण, कार्बनी वायूंचे उत्सर्जन हा चिंतेचा विषय आहे. १८८० पर्यंत वातावरणात कार्बनी वायूंचे २८० कण प्रती दशलक्ष कण इतके प्रमाण होते. आज हे प्रमाण ४०० पेक्षा जास्त झाले आहे. कार्बनी वायूंमध्ये उष्णता शोषून घेण्याची क्षमता जास्त असते. ते सूर्यप्रकाशापासून पृथ्वीवर येणारी ऊर्जा या कार्बनी वायूंच्या रेणूंकडून शोषली जाते. त्यामुळे जागतिक तापमान वाढ होते. मागील ७० वर्षांत पृथ्वीचे सरासरी तापमान एक डिग्री सेल्सियसने वाढले आहे.

याचा परिणाम म्हणून हिमशिखरे वेगाने वितळत आहेत. हे वितळलेल्या बर्फाचे पाणी उन्हाळ्यात पूर आणते. ज्या नदी पात्रातून हे पाणी वाहते, त्या पात्राच्या आजूबाजूचे शेतीक्षेत्रासह जनजीवन यामुळे प्रभावीत होते. हे सर्व टाळायचे असेल, तर वातावरणातील कार्बनी वायूंचे प्रमाण कमी झाले पाहिजे. कार्बनी वायूंना शोषून घेण्याची क्षमता केवळ हिरव्या वनस्पतींमध्ये आहे. कार्बन डाय ऑक्साईड वायूंचा वापर करून वनस्पती आपले अन्न बनवतात. याबदल्यात वातावरणात या वनस्पती ऑक्सिजन सोडतात.

मानवाने औद्योगिक प्रगती करताना, वायू प्रदूषण करणारे घटक वातावरणात सोडताना, तेवढ्या कार्बनी वायूंचे शोषण करण्याची क्षमता असणारे हिरवे आवरण तयार करायला हवे होते. यासंदर्भात शासनाने प्रतिबंधात्मक नियम बनवले आहेत. या नियमांचे पालन होणे आवश्यक असते. मात्र, तसे होत नाही. दुसरीकडे शेतीचे क्षेत्र वाढवणे, बांधावरील झाडांमुळे शेतीतील उत्पादन घटते म्हणून झाडांना वाढू देत नाही. औद्योगिक क्रांती झाडांची गरज वाढवते आणि शेती, बांधकाम क्षेत्र झाडांचे प्रमाण घटवत आहेत. यामुळे निसर्ग कोपला आहे... अशा प्रकारचा विकास, जगबुडीला निमंत्रण तर नाही ना!

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

21 SEP 2022 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन शिक्षण आजची गरज : डॉ. रेडेकर

## दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज आहे. सर्व घटकांना सामावून घेण्याचे प्रभावी साधन म्हणून ऑनलाईन शिक्षणाकडे पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या संगणक विभागाचे प्रभारी संचालक डॉ. अभिजित रेडेकर यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे आयोजित महाविद्यालयातील दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठीच्या कार्यशाळेत बोलताना डॉ. अभिजित रेडेकर.**

उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांनी, शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करावेत, असे सांगितले. यावेळी ऑनलाईन प्रवेश अर्जाचे प्रात्यक्षिक सादरीकरण संगणक विभागाचे ए. व्ही. घाटे, संग्राम पाटील यांनी केले. यामध्ये ५९ अभ्यास केंद्रांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय दत्तात्रय कमलाकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. परशराम देवळी यांनी केले. आभार डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

तरूण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ४८८ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ७४७ परीक्षांपैकी ४८८ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यापैकी काही विद्यार्थ्यांनी ओएमआर सीटवर आपला पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक, आदी माहिती चुकीची भरल्याने निकालामध्ये परीक्षेला उपस्थित नसल्याचे आले आहे.